**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २२ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **महालक्ष्मी सरस प्रदर्शन महिला बचत गटांसाठी प्रभावी बाजारपेठ असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन, प्रदर्शनात सुमारे 10 कोटी रुपयांच्या वस्तूंची विक्री.**
2. **नागपुरातील भांडेवाडी पोलीस ठाण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन.**
3. **कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचा उद्या RSS मुख्यालयावर मोर्चा.**

**आणि**

4. **विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये कमाल तापमानात लक्षणीय घट.**

**आता सविस्तर बातम्या .......**

महालक्ष्मी सरस

नागपुरात सुरु असलेल्या बचत गटांच्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सुमारे ४०४ स्टॉल्स उभारण्यात आले असून आतापर्यंत १० कोटी रुपयांची विक्री झाली आहे. ही विक्री पुढील काळात आणखी वाढण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. महालक्ष्मी सरस प्रदर्शनाला आज मुख्यमंत्र्यांनी भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. महालक्ष्मी सरस प्रदर्शन हे केवळ विक्रीचे ठिकाण नसून महिला बचत गटांसाठी प्रभावी बाजारपेठ म्हणून कार्य करत आहे. या प्रदर्शनाला नागरिकांचा प्रतिसाद वाढत असून 'महालक्ष्मी सरस' हा प्रदर्शनाचा ब्रँड अधिक मजबूत होत आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात शंभर कोटी रुपयांचा व्यवहार बचत गटाच्या माध्यमातून होत असल्याचंही त्यांनी सांगितलं. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी दीदी की रसोई उपहारगृह, प्रोजेक्ट ड्रीम १०० विलेज लायब्ररी, १४ आय सी टी लॅब झेड. पी. स्कूल, ए आय लॅब ऑन व्हील-ज्ञानरथ, सुपर ४० अंगणवाडी, गुरुकुल ए आय लॅब ४८ अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांचं लोकार्पण केलं.

जल दिन

'जागतिक जल दिन' आज साजरा करण्यात येत आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं संरक्षण आणि त्याचा जबाबदारीनं वापर करण्यासाठी आपण सर्व वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पाणी जीवनाचा आधार असून पृथ्वीच्या भविष्याचा आकार असल्याचं त्यांनी आंतरराष्ट्रीय जल दिनाच्या निमित्तानं दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्र संघानं देखील या निमित्तानं पाणी आणि लिंगभाव समानता या अनुषंगानं 'जिथे पाणी वाहतं तिथं समानता वाढते' ही संकल्पना मांडली असून जल व्यवस्थापनातली महिलांची महत्वपूर्ण भूमिका आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे त्यांच्यावर होणारा परिणाम तसंच त्याबाबतच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अधोरेखित केला आहे.

भांडेवाडी पोलीस स्टेशन

नागपूर शहरातील वाढती लोकसंख्या, शहराच्या बाहेरील भागांमध्ये होणारे शहरीकरण तसच कायदा आणि सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशान स्थापन करण्यात आलेल्या नागपुरातील भांडेवाडी पोलीस ठाण्याचं उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. या प्रसंगी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, पोलीस आयुक्त डॉ रवींद्र कुमार सिंघल, पोलीस उपायुक्त निकेतन कदम तसच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भांडेवाडी पोलीस ठाण्याच्या स्थापनेमुळ परिसरातील नागरिकांना जलद आणि प्रभावी पोलीस सेवा उपलब्ध होणार असून गुन्हे प्रतिबंध, कायदा आणि सुव्यवस्था राखणे तसच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यास मदत होणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

कॉंग्रेस मोर्चा

नागपुरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी उद्या मोर्चा काढणार आहे. कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली नागपुरातील संविधान चौक ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयापर्यंत हा मोर्चा निघेल. एपस्टिन फाईल मध्ये कथितरीत्या भाजप नेत्यांची नावं आली असून केंद्र सरकार अमेरिका धार्जिणी धोरणं राबवत असल्याचा आरोप दोन्ही पक्षांनी केला. याचा निषेध करण्यासाठी हा मोर्चा काढला जात आहे, असं कॉंग्रेसन पत्रकात म्हटलं आहे. तसंच परराष्ट्र धोरणात अपयशी ठरल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजीनामा द्यावा अशी मागणीही त्यांनी केली आहे.

व्यावसायिक गॅस

राज्यातील हॉटेल, उपाहार गृहांसाठी आता २० टक्के अतिरिक्त गॅस पुरवठा होणार असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसच औद्योगिक कॅन्टीन आणि अन्न प्रक्रिया-दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार २० टक्के अतिरिक्त व्यापारी एलपीजी पुरवठा करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयान दिनांक २१ मार्च रोजी दिलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के वाटप मंजूर होते. आता २३ मार्च पासून पुढील आदेश येईपर्यंत आणखी २० टक्के वाटप वाढविण्यात आले असून एकूण गॅस पुरवठा पूर्व-संकट पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या शिवाय २० टक्के वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया आणि दुग्ध व्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. तसच राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स आणि स्थलांतरित मजुरांसाठीच्या योजनांनाही लाभ मिळणार आहे.

उपराष्ट्रपती

निसर्गोपचार ही शाखा निसर्गाशी सुसंवाद राखायला प्रोत्साहन देते, असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. पुण्यात उरळी कांचन इथल्या निसर्गोपचार केंद्राच्या ८१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते आज प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पारंपरिक भारतीय उपचार पद्धती सध्याच्या काळाशी अधिक समर्पक असल्याचं ते म्हणाले.

भोंदू बाबा खरात

महिलेच्या लैंगिक छळ प्रकरणात अटकेत असलेल्या कॅप्टन अशोक खरात याच्यावर आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. आपण गर्भवती असताना त्याच्या कार्यालयात अत्याचार केला तसच अघोरी कृत्य करण्यासाठी सिन्नर तालुक्यातील ईशान्येश्वर मंदिराच्या ट्रस्टच्या नावान आपल्याकडून पैसे घेतले अशी तक्रार एका पीडित महिलेन नोंदवली आहे. याप्रकरणी नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात खरात याच्यावर गुन्हा दाखल झाला असून चौकशी सुरू आहे.

आरटीई प्रवेश

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 मधील कलम 12 (1) (सी) नुसार आर्थिकदृष्या दुर्बल आणि वंचित घटकांतील मुलांसाठी खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये 25 टक्के मोफत शिक्षणांची तरतूद आहे. आरटीई अंतर्गत 25 टक्के प्रवेशासाठी 1 कि.मी. पर्यंतच्या अंतरावरील शाळा

निवडण्याचे स्वातंत्र्य पालकांना देण्यात आलेल होत. तथापि उच्च न्यायालयान नोंदविलेल्या निरिक्षणानुसार जर 1 कि. मी. अंतरावर शाळा उपलब्ध नसेल, तर मुलांना त्यापेक्षा जास्त अंतरावरील शाळेमध्ये प्रवेश घेण्यापासून रोखता येणार नाही. त्यानुसार 25 टक्के प्रवेशासाठी अर्ज भरण्यासाठी असलेली 1 कि.मी. अट रद्द करण्यात आली आहे. तसंच प्रवेश अर्जासाठी २५ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

पश्चिम आशिया संघर्ष

इराणन होर्मूझची सामुद्रधुनी येत्या ४८ तासांमध्ये खुली केली नाही, तर इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर विध्वंसक हल्ले केले जातील, असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. हे हल्ले इराणच्या सर्वात मोठ्या ऊर्जा प्रकल्पापासून सुरु होतील, आणि त्यानंतर इतर प्रकल्पांचं लक्ष्य साधलं जाईल असं त्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. दरम्यान इराणनं इस्रायलच्या दिमोना आणि अराद या शहरांवर काल बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा हल्ला केला. इराण मध्ये दिमोना शहरात नेगेव्ह अणुसंशोधन केंद्र आहे. या हल्ल्यामुळे अणुसंशोधन केंद्राची हानी झाली नाही, तरीही एकूण १३० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाल्याचं आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेनं म्हटलं आहे. इराण विरोधातली मोहीम आणखी तीव्र केली जाईल, असा इशारा इस्राएलनं दिला आहे.

वाळू उत्खनन

भंडारा जिल्ह्यातील तीनही महसूल उप विभागांतील १०९ वाळू घाटांविरुद्ध 'राष्ट्रीय हरित लवादाकडे' दाखल करण्यात आलेली याचिका २० मार्च रोजी निकाली काढण्यात आली. जिल्हा प्रशासनान सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे याचिकाकर्त्यांचे आक्षेप फेटाळून लावत सर्व घाटांवरील वाळू उत्खननावरील स्थगिती हटविण्यात आली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील वाळू उत्खनन पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याचिका निकाली काढलेल्या या १०९ वाळू घाटांमध्ये घरकुलासाठी राखीव असलेल्या १२ घाटांचाही समावेश आहे.

हवामान दिवस

उद्या जागतिक हवामान दिनानिमित्त नागपूर प्रादेशिक हवामान केंद्रात हवामान उपकरणांचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. "आजचे निरीक्षण, उद्याचे संरक्षण" या संकल्पनेला अनुसरून हवामान खात्याशी संदर्भात थ्रीडी मॉडेल्स, प्रात्यक्षिक आणि विविध यंत्र आणि उपकरणांचं हे प्रदर्शन सर्वांसाठी खुलं

असेल. याशिवाय, अभ्यागतांना 'सरफेस ऑब्झर्व्हेटरीला' भेट देण्याची तसच सायंकाळी ४:३० वाजता रेडिओसाँड पाहण्याची संधी मिळणार आहे.

हवामान

मागील काही दिवसांपासून असलेल्या ढगाळ हवामानामुळे विदर्भातील सर्वच जिल्हयांमध्ये कमाल तापमानात लक्षणीय घट दिसून आली. मागील 24 तासांत सर्वाधिक कमाल तापमान वाशिम येथे 36 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवल गेल. भंडारा आणि गोंदिया येथे कमाल तापमान 32 च्या घरात राहिलं तर गडचिरोली इथं 34, चंद्रपूर येथे 35 पूर्णांक 2, यवतमाळ येथे 35, वर्ध्यात ३६,अमरावतीत 35 पूर्णांक 8 तर बुलढाणा येथे 33 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. दरम्यान आज नागपुरात 33 पूर्णांक 6 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. यापुढील काही दिवस हवामान सामान्य राहण्याचा अंदाज आहे.

*****